—: प्रेस नोट :—

दिनांक : ३०.०६.२०२१

| | |
|---|---|
| घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री.नारायण जयवंत चव्हाण, वय २९ वर्ष, पद अव्वल कारकुन/ पुरवठा निरीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, अमरावती., वर्ग —३.<br>२) श्री.अविनाश अनंत भगत, वय २९ वर्ष, पद — तांत्रिक सहायक (कंत्राटी) जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, अमरावती. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/— रुपये पडताळणी दरम्यान पहीला हफ्ता तात्काळ म्हणुन ४०,०००/— रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४०,०००/— रु. |
| घटनास्थळ | डि मार्टचे मुख्य पॉकींग समोरील बाजुस, बियाणी चौक, कॅम्प, अमरावती |
| घटना तारीख व वेळ | दि.३०/०६/२०२१ चे दुपारी अंदाजे ०२.३४ वा. ते ०२.४४ वा. दरम्यान |

<u>थोडक्यात माहिती</u> :— यातील तक्रारदार महिला शासकीय कर्मचारी असुन त्यांनी दिनांक २९/०६/२०२१ रोजी तक्रार दिली की, त्यांचेविरूध्द एका शासकीय रास्त दुकानदार यांनी केलेल्या तक्रारीवर जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, अमरावती येथे होत असलेल्या चौकशीमध्ये कोणतीही कारवाई न होवु देण्याकरीता संबधीत काम पाहणारे अव्वल कारकुन श्री.चव्हाण हे ५०,०००/— रूपये लाचेची मागणी करीत आहे. वरून आज दिनांक ३०/०६/२०२१ रोजी पंचासमक्ष आ.लो.से. कमांक १) श्री.चव्हाण यांनी पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार महीला यांना त्यांचे विरूध्द होत असलेल्या चौकशी मध्ये कोणतीही कारवाई न होवु देण्याकरीता (न करण्याकरीता) ५०,०००/— रूपये लाचेची मागणी करून पहीले तात्काळ ४०,०००/— रूपये स्विकारण्याचे मान्य करून रक्कम जमल्यास त्यांचेसोबत असलेले आ.लो.से. कमांक २) श्री.भगत यांना फोन करून लाच रक्कम त्यांचेकडे देण्यास सांगितली त्यानंतर आजच सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष आ.लो.से. कमांक १) श्री.चव्हाण यांचेवतीने आलोसे कमांक २) श्री.भगत यांनी ४०,०००/— रूपये लाच रक्कम तक्रारदार महीला यांचेकडुन पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. दोन्ही लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरूध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री.विशाल गायकवाड सा.,अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परीक्षेत्र, अमरावती, श्री.अरूण सांवत सा. व घटक प्रमुख श्री.गजानन पडघन सा.यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.राहुल वसंतराव तसरे व पो.कर्मचारी विनोद कुंजाम,सुनिल जायभाये व उपेंद्र थोरात यांनी पार पाडली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ललित सेंटर, परांजपे कॉलनी, कॅम्प, अमरावती.
टोल फ्री नंबर — १०६४ दुरध्वनी कमांक — ०७२१—२५५२३५५,२५५३०५५.

(राहुल तसरे)
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती.
मो.कं.८८०५९६३१००

REDMI K20 PRO

Scanned with CamScanner